# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ़ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.**
**दूरध्वनीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फ़ॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.**
ई-मेलः **mercindia@mercindia.org.in**
वेब-साईट- www.mercindia.org.in


## प्रसिध्दी पत्रक

## राज्यातील वीज टंचाईवर तात्पुरता आणीबाणीचा उपाय म्हणून भारनियमनाचा कालावधी वाढवण्यासाठी महावितरण कंपनीचा प्रस्ताव

राज्यातील विजेची मागणी व पुरवठा यातील तफावत सुमारे ५३०० ते ५५०० मेगॅवॉट इतकी वाढल्याने ती कमी करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी लि. (महावितरण कंपनी) ने आयोगाकडे तात्पुरता आणीबाणीचा उपाय म्हणून भारनियमनाचा कालावधी वाढवण्यास मंजुरी देण्यासाठी आयोगाकडे प्रस्ताव सादर केला. महावितरणच्या दिनांक ६ फेब्रुवारी २००७ च्या प्रस्तावावर जनतेकडून सूचना व अभिप्राय मागविण्यात येऊन आयोगाने दिनांक १५ फेब्रुवारी २००७ रोजी पुणे येथे जाहीर सुनावणी घेतली.

आयोगाने दिनांक २० फेब्रुवारी २००७ रोजी या संबंधात आदेश पारित केला आहे. या आदेशाची ठळक वैशिष्टये आणि भारनियमनाची तत्त्वे व कार्यपध्दतीमध्ये करण्यात आलेले बदल खालीलप्रमाणे-

१) विजेच्या मागणीत वाढ झाली नसून विजेची उपलब्धता कमी झाल्याने मागणी व पुरवाठ्यातील तफावतीत वाढ झाली आहे. हे महावितरणने मांडलेल्या मुद्द्यांवरून स्पष्ट झाले आहे

२) मागील दशकात वीज निर्मिती क्षमतेत वाढ करण्यासाठी योग्य नियोजन करून पावले टाकण्यात आली असती तर सध्याची तफावत मोठ्या प्रमाणावर कमी करता आली असती व मागणी व पुरवठा यातील दरी कमी झाली असती, हे जरी सत्य असले तरी भारनियमनात होणारी ही वाढ ग्राहकांच्या विविध वर्गवारीत सम प्रमाणात विभागणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे पूर्वी घालून दिलेली १२ तासांची भारनियमनाची मर्यादा वाढवण्याची परवानगी देणे आयोगाला भाग पडले आहे.

३) बिगर सतत प्रक्रिया उद्योगांनी व सतत प्रक्रिया उद्योगांनी त्यांचा युनिटस्मधील मासिक वीज वापर हा त्यांच्या मागील वर्षातील (जानेवारी ते डिसेंबर २००६) सरासरीच्या अनुक्रमे ८० आणि ९० टक्के इतका किंवा त्याहून कमी करावयाचा आहे. वीज वापरातील या ठरवून देण्यात आलेल्या मर्यादांची पूर्तता येत्या दोन महिन्यांत न झाल्यास औद्योगिक वर्गवारीतील ग्राहकांकरिता आणखी एक सक्तीची साप्ताहिक सुटी वाढवावी लागेल. तथापि महावितरण कंपनीला भविष्यात जर अतिरिक्त वीज प्राप्त झाली आणि फीडर अलग करण्याची योजना हाती घेणे शक्य

होऊन त्यामुळे यापूर्वीप्रमाणे कमीत कमी १२ तासांच्या मर्यादेतील भारनियमन करणे शक्य झाले तर हे निदेश लागू होणार नाहीत.

४) स्वतंत्र फीडरवरील रेल्वे ट्रॅक्शन भार व सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांना नियोजित भारनियमन लागू होणार नाही.

५) विद्युतभारामध्ये अपेक्षित दिलासा मिळावा यासाठी महावितरण कंपनीने सुचवलेले पर्याय लक्षात घेऊन,महावितरणने प्रस्तावामध्ये सुचविलेल्या भारनियमनापेक्षा, ज्यावर जाहीर सुनावणीच्या वेळी चर्चा झाली आहे, त्यापेक्षा अधिक भारनियमन करण्याबाबत आयोगाला विचार करावा लागला आहे.

६) नागरी व औद्योगिक वस्त्या, अन्य विभाग व शेती प्रभावित विभाग यामधील भारनियमनाच्या वाटपाचे प्रमाण १:१.५:३.५, ऐवजी १:१.४:२.८ असे बदलण्यात आले आहे. आयोगाने नागरी व औद्योगिक वस्त्या, अन्य विभाग आणि शेती प्रभावित विभाग यांच्याकरीता अनुक्रमे २ तास, २ तास, आणि ३ तास याप्रमाणे अतिरिक्त भारनियमनाबाबत विचार केला आहे.

७) अतिरिक्त वीज उपलब्ध झाल्याने वा आणि/किंवा विजेची मागणी कमी झाल्यामुळे अ, ब, क, ड या वर्गवारीतील विभागांना त्या क्रमाने भारनियमनात सूट मिळेल-याबाबतीत प्रथम सूट शेती प्रभावित विभागाला मिळेल त्यानंतर अन्य विभाग व शेवटी नागरी आणि औद्योगिक वस्त्यांना सूट मिळेल.

८) वरील वर्गवारी व तत्त्वांवर आधारित सायंकालिन कमाल मागणी ५५०० ते ५७०० मेगॅवॅट तफावत असेल या गृहितावर आधारित उदाहरण खालीलप्रमाणे-

| वर्गवारी | नागरी व औद्योगिक वस्त्या | अन्य विभाग | शेती प्रभावित विभाग | अक्षय प्रकाश योजना | | शेती फीडर अलगीकरणाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | थ्री फेज, सिंगल फेज, भारनियमन | सिंगल फेज भारनियमन | थ्री फेज भारनियमन | थ्री फेज, सिंगल फेज, भारनियमन |
| अ | ४.५ | ६.५ | १४ | २ | १४ | १४ |
| ब | ५ | ७ | १४.५ | २ | १४ | १४ |
| क | ५.५ | ७.५ | १५ | २ | १४ | १४ |
| ड | ६ | ८ | १५ | २ | १४ | १४ |

९) उपविभागीय पातळीवर आणि कार्यपध्दतीची अंमलबजावणी करण्यासाठी, फीडर पातळीवर कार्यपध्दतीचे संनियंत्रण करण्यासाठी महावितरण कंपनीने स्थानिक प्रमुख नागरिकांची एक समिती स्थापन करावी आणि प्रत्येक उपकेंद्रावर भारनियमनासाठी असलेली कार्यपध्दती आणि सध्याच्या भारनियमनाबाबत असलेले प्रत्येक फीडरचे वेळापत्रक उपकेंद्रावर ठळकपणे प्रदर्शित करावे, तसेच त्यास स्थानिक वर्तमानपत्रातून पुरेशी प्रसिध्दी द्यावी. महावितरण कंपनीच्या दक्षता पथकाने भारनियमानाच्या वेळापत्रकाचे संनियंत्रण करावे व कोणतीही तफावत आढळल्यास त्याबाबत आयोगाला थेट कळवावे.

१०) शेतीसाठीचे फीडर अलग करण्याचे काम तातडीने हाती घेण्याचे निदेश आयोग महावितरण कंपनीला देत आहे. या योजनांची अंमलबजावणी वेळापत्रकाप्रमाणे करण्यात आली व महावितरण कंपनीला अपेक्षेनुसार अतिरिक्त वीज प्राप्त झाली तर भारनियमनाचा कालावधी आणखी कमी करता येईल.

११) जेथे औद्योगिक ग्राहकांकडे स्ववापरासाठीच्या वीज निर्मिती प्रकल्पांची शिल्लक क्षमता उपलब्ध आहे, त्या भागात भारनियमन शिथील करण्यासाठी पुण्यातील प्रयोगाचा विचार करण्यात यावा. तसेच ज्या नागरी व औद्योगिक वस्त्यातील विभागांमध्ये अशी वीज उपलब्ध नाही तेथे फ्रँचायझीमार्फत वीज निर्मिती व वितरण करण्याच्या पर्यायाचाही विचार करण्यात यावा.

१२) खर्चिक वीजेच्या बाबतीत अतिरिक्त पुरवठा खर्चात आणि कमी खर्चिक विजेच्या बाबतीत इंधन आकारात कमी वा नकारात्मक वाढ करून, वीज खरेदी खर्चात झालेल्या घटीचा लाभ महावितरण कंपनीने ग्राहकांना द्यावा.

१३) मागणी व पुरवठा यातील तफावत कमी करण्यासाठी अतिरिक्त वीज खरेदी करण्यास मान्यता द्यावी म्हणून महावितरणने वेगळी याचिका सादर केली आहे. या याचिकेचा विचार स्वतंत्ररित्या करण्यात येत आहे. या संबंधी कोणत्या विनियमाखाली आयोगाची मान्यता मागण्यात आली आहे व तसेच त्याची गणना कशी करण्यात आली आहे, हे सादर करण्याचे निदेश महावितरणला देण्यात येत आहेत. शिवाय, आयोगाच्या आदेशात आणि याचिकेत विचार केल्यापेक्षा अंदाजित विक्री आणि वितरण तोटे हे अधिक नसल्याचे महावितरण कंपनीने मान्य केले असल्याने या अतिरिक्त वीज खरेदीची आवश्यकता का आहे, याचे समर्थनही महावितरण कंपनीने द्यावे.

१४) या सुधारित कार्यपध्दतीची अंमलबजावणी तातडीने करायची असून त्याला पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी.

हा आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(श्रीमति मालिनी शंकर)**
**सचिव, मविनिआ**

**२० फेब्रुवारी २००७**